REGISTERED No. B. 3434

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २५ आक्टोबर, १९५० अंक ४३

## दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली

( स्थापना सन १९२७ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,९३,५०० रु. |
| भरलेलें भांडवल | १,१४,११० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,१७,५४३ रु. |
| खेळतें भांडवल | १५,५१,०८८ रु. |

या बँकेंत मुदतींच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागीदारांना योग्य तारणावर कर्जे दिलीं जातात. सोन्याचे तारणावर सवलतीचे व्याजाचे दरानें कर्ज दिलें जातें. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक–हुंड्यांची खरेदी-विक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदी-विक्री व व्याज-वसुली वगैरे

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार
या बँकेमार्फत केले जातात.

ना. पां. ठाणेदार — मॅनेजर
भ. अं. दप्तरदार, बी. ए. — चेअरमन.

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि सेन्ट्रल म्युच्युअल विमा कंपनी, लिमिटेड

हेड ऑफिसः—६७, अपोलो स्ट्रीट, सोनावाला बिल्डिंग, मुंबई.

★ नव्या कामाचे मोठे आकडे हेंच केवळ विमा कंपनीच्या यशाचें खरें गमक नव्हे. विमेदारांची योग्य निवड, काटकसरीची शास्त्रशुद्ध पण चोख व्यवस्था याचीच या धंद्यास खरी जरूरी आहे. आमचा कारभार वरील तत्त्वानुसारच चालतो, याची आजच खात्री करून घ्या.

शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर.

Dr. WAMAN GOPAL'S
SARSAPARILLA
BEST BLOOD PURIFIER

दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स
मशीन टूल्स
कडवा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.

## विविध माहिती

**महात्माजींच्या पत्रांची फिल्म**—महात्मा गांधींनीं जनरल स्मट्स् आणि लिओ टॉयलस्टॉय ह्यांना लिहिलेल्या पत्रांचीं मायक्रो-फिल्म घेण्यांत येणार आहे. ह्या कामासाठीं अमेरिकेकडून जरूर तो कॅमेरा घेऊन एक तज्ज्ञ मुद्दाम हिंदुस्थानांत आला आहे. जुने कागदपत्र जीर्ण होऊन नाश होण्याची भीति असल्यानें त्यांची नक्कल फिल्मवर घेऊन ठेवण्याची पद्धत आतां अंमलांत येत आहे.

**कुलकर्णी नाखूष**—कुलकर्णी वतन खालसा करण्याचें जें बिल सध्यां मुंबई सरकारनें विधिमंडळांत आणलें आहे त्याला कर्नाटकांतील कुलकर्णी वतनदारांनीं आपला विरोध प्रगट केला आहे. त्यांच्या मतें भारताच्या घटनेप्रमाणें व्यक्तीला देण्यांत आलेल्या मूलभूत हक्कांशीं वरील बिल विसंगत आहे.

**निर्वासितांच्या ठेवी**—ज्या मुसलमान निर्वासितांनीं पूर्व पंजाबांतील सहकारी बँकांतून आपल्या ठेवी ठेवल्या होत्या त्यांना त्यांच्या नांवावर उरलेल्या रकमांच्या ५० टक्के रकम १ डिसेंबर, १९५० पासून देण्यांत येणार आहे.

**कापडावरील जकात उठवा**—कापडावर घेण्यांत येणारी भारी जकात रद्द करण्यांत यावी अशी विनंती श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं एका भाषणांत केली. स्वस्त हिंदी कापसापासून तयार केलेलें कापड भारतांत खपवावें आणि आयात केलेल्या कापसापासून तयार केलेलें कापड निर्यात करावें असेंही त्यांनीं सुचविलें.

**बँक ऑफ कॅनडाचा व्याजाचा दर**—बँक ऑफ कॅनडानें चार्टर्ड बँकांना देण्यांत येणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर १॥ टक्क्यावरून २ टक्के इतका वाढविला आहे. देशाच्या संरक्षण योजनेवरील खर्चांत वाढ झाल्यामुळें व्याजाच्या दरांत ही वाढ करण्यांत आली आहे.

**आभाळी रंगाचा चित्ता**—बँकॉक ( सयाम ) मधील एका डॉक्टरानें आभाळी रंगाचा एक चित्ता पकडून तो लोकांना पहाण्यासाठीं ठेवला आहे. ह्या चित्त्याचे सुळे लांब असल्यामुळें प्रमाणाबाहेर त्याला आपलें भक्ष्य शोधण्यास कष्ट पडतात. त्यामुळेंच असा चित्ता सहसा सांपडत नाहीं. २० वर्षांपूर्वी असाच एक चित्ता सांपडला होता.

**पाकिस्तान–पश्चिम जर्मनी व्यापार**—पश्चिम जर्मनीच्या व्यापारी शिष्टमंडळानें पाकिस्तानशीं एक व्यापारी करार केला आहे. कराराला अजून उभय सरकारांची मान्यता मिळावयाची आहे. पाकिस्तानला जर्मनी कोळसा, रेल्वेचें सामान, रसायनें व कापड पुरविणार आहे. पाकिस्तान जर्मनीला ताग, गहूं व कातडीं पुरविणार आहे.

**जुन्या हस्तलिखिताची खरेदी**—आग्रा कॉलेजच्या ग्रंथालयाकडून मोंगलकालीन १८ ग्रंथालयांचीं हस्तलिखितें २४,००० रु. देऊन विकत घेण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे, असें समजतें. कॉलेजजवळील मौल्यवान जुन्या हस्तलिखितांत बाबर बादशाहाच्या सुप्रसिद्ध आठवणीही आहेत. भारताच्या प्राचीन राष्ट्रीय कागदपत्रांत वरील ग्रंथ ठेवण्यांत येणार आहेत.

**ब्रिटनचा राहणीचा निर्देशांक**—आंतरराष्ट्रीय मजूर कचेरीनें प्रसिद्ध केलेल्या आकड्याप्रमाणें, ब्रिटनमधील राहणीचा निर्देशांक गेल्या वर्षांत सुमारें २ टक्क्यांनीं वाढला आहे. ऑगस्ट अखेर पुऱ्या झालेल्या वर्षांत पैराग्वे ह्या देशांतील रहाणीचा निर्देशांक सर्वांत अधिक म्हणजे ५५ टक्क्यांनीं वाढला.

### साभार पोंच

खालील बँकांचे अहवाल आमचेकडे आले आहेत. त्यांवरील अभिप्राय थोड्या सवडीनें अगत्य देण्यांत येतील. ( १ ) अर्बन को. बँक, सांगली. ( २ ) महालक्ष्मी को. बँक, कोल्हापूर. ( ३ ) सांगली स्टेट सें. को. बँक. ( ४ ) कोल्हापूर अर्बन को. बँक. ( ५ ) श्रीलक्ष्मी सें. को. बँक, फलटण ( ६ ) बेळगांव पायोनियर अर्बन बँक. ( ७ ) कोल्हापूर मराठा को. बँक. ( ८ ) सन्मित्र को. अर्बन बँक, कल्याण. ( ९ ) इचलकरंजी सें. को. बँक. ( १० ) कोल्हापूर स्टेट सें. को. बँक. ( ११ ) कमर्शिअल बँक लि., कोल्हापूर. ( १२ ) को. पीपल्स बँक लि., लिंब. ( १३ ) शिरपूर मर्चंटस को. बँक. ( १४ ) इस्लामपूर को. पीपल्स बँक. ( १५ ) तासगांव अर्बन को. बँ०. ( १६ ) अन्योन्य सहाय्यकारी मंडळी, बडोदें. ( १७ ) लक्ष्मी को बँक, सोलापूर. ( १८ ) डेक्कन मर्चंटस को. बँक, मुंबई. ( १९ ) विजापूर डि. सें. को. बँक. ( २० ) चिपळूण अर्बन को. बँक.

पो. बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८३
पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह
बँक लिमिटेड, पुणें.
लक्ष्मी रोड, पुणें २.
भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.
चालू, सेव्हिंग्ज्, ठेवी स्वीकारल्या जातात.
एक वर्ष व दोन वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.
एक वर्ष मुदतीस दीड टक्का.
दोन वर्षें अगर जास्त मुदतीस दोन टक्के.
वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्या खेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडी ( सीलबंद पेट्या ) चा व्यवहार सुरू आहे. सर्वांनीं त्याचा फायदा घ्यावा.
मो. वि. रबडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.

अर्थ

बुधवार, ता. १५ आक्टोबर, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## आर्थिक घसरगुंडी थांबविण्याचा प्रयत्न

### रिझर्व्ह बँकचा चलन-नाण्यांविषयीं अहवाल

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचा करन्सी व फिनॅन्स वरील १९४९-५० चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यामध्यें मार्च १९५० अखेर संपलेल्या वर्षांतील आर्थिक घडामोडींचा आढावा घेण्यांत आला आहे. रिपोर्टाचीं एकूण २५९ पृष्ठें असून त्यांत २८ ग्राफ आणि ९२ तक्ते समाविष्ट आहेत. रिपोर्टाच्या पहिल्या भागांत परदेशांतील आर्थिक घडामोडींची माहिती देण्यांत आली आहे. तिचा उपयोग भारताच्या प्रगतीचें तुलनात्मक स्वरूप नीट लक्षांत येण्यास उत्तम प्रकारें होतो. सप्टेंबर १९४९ मध्यें ब्रिटिश पौंडाचें अवमूल्यन करण्यांत आलें त्याच्या पाठोपाठ बऱ्याच देशांनीं स्वतःच्या चलनांचेंहि अवमूल्यन केलें, ही गेल्या वर्षांतील सर्वांत महत्त्वाची बाब होय. त्यामुळें, जगांतील इतर देशांना भासणाऱ्या अमेरिकन डॉलरच्या तुटवड्याची तीव्रता थोडी कमी होण्यास मदत झाली. जागतिक बँकेकडून भारतास ४·४ कोटी डॉलर्सचें कर्ज मिळालें. आशियांतील राष्ट्रांमध्यें बँकेकडून कर्ज मिळण्याचा "मान" प्राप्त होणारा भारत हा पहिला देश होय!

रिपोर्टाच्या दुसऱ्या भागांत हिंदी चलन व नाणें ह्यांच्या परिस्थितीचा आढावा घेण्यांत आलेला आहे. नियंत्रणें, रुपयाचें अवमूल्यन, ऑक्टोबरमध्यें अर्थमंत्र्यांनीं किंमती थोपवून धरण्यासाठीं जाहीर केलेला कार्यक्रम, अन्न नियोजन, इत्यादि बाबत सरकारच्या धोरणाचा परामर्श घेऊन पुढें अधिक धान्य पिकवा मोहिमेच्या परिणामांची हकीकत देण्यांत आली आहे. ह्या मोहिमेवर १९४८ मध्यें ६ कोटी, ९० लक्ष रु. खर्च झाले हें निश्चित. त्यामुळें ०७,७०,९१४ टन जास्त धान्य पिकलें, असा हिशेब आहे. प्रमुख गळिताच्या धान्यांचें (तीळ, भुईमूग, आळशी, एरंडी, सरकी, तुरी) उत्पादन १९४७-४८ मध्यें ५१·२ कोटी टन झालें, तें किंमतींत वाढ होऊनहि ४५.२ कोटी टनांपर्यंत खालीं गेलें. कपाशीच्या उत्पादनांत ३.२४ लक्ष गाठींचीं घट झाल्या कारणानें, कापडाच्या सुताचा तुटवडा चांगलाच जाणवला. भारताच्या तागाच्या गिरण्यांना दरसाल एकूण ७०·५ लक्ष गांठी ताग लागतो. फाळणीमुळें, आपल्याला तागाचा तुटवडा पडूं लागला आहे आणि सध्यां आपलें तागाचें उत्पादन २०.५ लक्ष गाठी इतकेंच आहे. तें सुधारण्यासाठी तीन वर्षांचा कार्यक्रम आंखण्यांत आलेला आहे. पोलाद, सिमेंट व कोळसा ह्यांच्या उत्पादनांतील वाढ उत्तेजनकारक आहे.

१९४९-५० मध्यें किंमती ६% नें वाढल्या. पैशाच्या बाजारांतील तंगी गेल्या वर्षीं थोडी कमी भासली. शेड्यूल्ड बँकांच्या शाखांच्या संख्येंत बरीच घट झाली. शेड्यूल्ड बँकांकडील ठेवी ६१ कोटींनीं कमी झाल्या. रिझर्व्ह बँकेनें सर्व बँकांकडून तपशीलवार माहितीचे तक्ते मागविण्यास प्रारंभ केला त्यामुळें बँकांनीं दिलेल्या कर्जाची छाननी करून त्याची तुलनात्मक माहिती उपलब्ध होऊं शकली आहे. परदेशी हुंडणावळींतील प्रतिकूल तफावत ११९ कोटी रु. वरून ७३ कोटी रु. वर उतरली आहे.

मध्यवर्ती व घटक राज्य सरकारांचा चालू खर्च चालूं उत्पन्नांतून सामान्यतः भागला असला, तरी गेल्या दोन वर्षांतील त्यांचा भांडवली खर्च मात्र मोठ्या तुटीस कारणीभूत झालेला आहे. मध्यवर्ती सरकारच्या शिलकांत १९४८-४९ मध्यें ८२ कोटी रुपयांची व १९४९-५० मध्यें ९७ कोटी रुपयांची घट झाली; १९५०-५१ मध्यें त्या शिलका आणखी १८ कोटी रुपयांनीं घटणार असा अंदाजपत्रकांतील अंदाज आहे. घटक राज्यांनींहि आपल्या शिलका १९५०-५१ मध्यें ६४ कोटींनीं कमी करून बजेटांची तोंडमिळवणी झाल्याचें दाखविलें आहे. त्यामुळें सामान्य मनुष्यास ही परिस्थिति लक्षांत येत नाहीं. मध्यवर्ती सरकारचा भांडवली व चालूं खर्च मिळून १९४८-४९ मध्यें ८६६ कोटी रु. व १९४९-५० मध्यें ६३१ कोटी रु. झाला, तर एकूण उत्पन्न अनुक्रमें ७५० कोटी रु. व ५०७ कोटी रु. झालें. १९४८-४९ चे प्रारंभीं २७४ कोटी रु. शिल्लक होते, ते १९५०-५१ अखेर फक्त ७८ कोटी रुपये रहातील, असा अंदाज आहे. करांतून किंवा कर्जांतूनहि खर्च न भागवता तो शिलकांतून भागविल्यानें सरकारची पैशाची अडचण कांहीं काळ लपून राहिली, तरी हें किती दिवस चालणार?

रिपोर्टांत अनेक महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं तपशीलवार माहिती आणि आंकडे हीं आहेत आणि सबंध रिपोर्टाचा परामर्श येथें थोडक्यांत घेतां येणें अशक्य आहे. परंतु, भारत सरकारचा प्रयत्न अद्याप घसरगुंडी थांबविण्याचा आहे, चढून जाण्यास विलंब लागणार व त्यासही कठोर उपाय योजनांची आवश्यकता आहे हें उघड आहे. एखाद्या रोग्याच्या रोगाविषयीं, बराच काळ झाला म्हणजे आस्था कमी होते आणि त्याच्या दुःस्थितीकडे दुर्लक्ष होतें; तसें देशाच्या आर्थिक परिस्थितीसंबंधीं होऊं नये आणि प्रयत्नांत कसूर केली जाऊं नये, ह्या दृष्टीनें जागरूक लोकमताची आवश्यकता आहे.

---

**ब्रिटनचें परदेशांत गुंतलेलें भांडवल**— १९३८ ते १९४८ ह्या दहा वर्षांत ब्रिटनच्या परदेशीं गुंतलेल्या भांडवलापैकीं ४५ टक्के भांडवल त्यानें गमावलेलें आहे, असें बँक ऑफ इंग्लंडनें आपल्या आढाव्यांत जाहीर केलें आहे. उरलेलें भांडवल बरेंच असलें तरी त्यामानानें परदेशांचें कर्ज अधिक आहे. वरील दहा वर्षांत ब्रिटनच्या ३४५·५ कोटी पौंड परदेशी भांडवलाची किंमत १९६·० कोटी पौंडाइतकी खालीं घसरली. झालेल्या तोट्याबद्दल ब्रिटनला १३५·२ कोटी पौंड रोख मिळालें. भांडवल कमी होण्याचें प्रमाण खालीलप्रमाणें आहे:—हिंदुस्थान व पाकिस्तान ८२%, कॅनडा ६१% ऑस्ट्रेलिया २४%, द. आफ्रिका ३६%, न्युझीलंड ५१%, इतर कॉमनवेल्थ देश ८%, सर्व कॉमनवेल्थ देश ४३%, अर्जेंटिना ८६%, अमेरिका ७२%, ब्राझील ५०%, युरोप २३%, मेक्सिको ५५%, इतर परराष्ट्रें ३%, सर्व परराष्ट्रें ५०%.

## ग्रामोद्धारांत सहकाराचें स्थान

### श्री. पु. पां. गोखले ह्यांचें भाषण

पुणें महाराष्ट्र सहकारी विद्यालयाच्या विद्यमानें कऱ्हाड येथील दि कराड अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष, मुंबई विधिमंडळाचे सन्माननीय सभासद आणि सातारा जिल्ह्यांतील एक निष्ठावंत सहकारी कार्यकर्ते आमदार पु. पां. गोखले यांचें दि. ११ ऑक्टोबर रोजीं विद्यार्थ्यांकरितां व्याख्यान झालें. दि. ११ रोजीं ग्रामोद्धार सप्ताहाचा समारोप असल्यामुळें त्या दिवसाचें औचित्य साधून 'ग्रामोद्धारांतील सहकाराचें स्थान' हाच विषय त्यांनीं निवडला होता. ते म्हणाले—"हिंदुस्थान हा येथून तेथून खेड्यांचा देश आहे. खेडेगांव अथवा ग्राम- हाच आमच्या लोकवस्तीचा प्रधान आणि मूल घटक आहे. त्यामुळें ग्रामोद्धाराच्या कार्यांतून जणूं कांहीं भूगर्भांत दडलेलीं ग्रामें वर खेंचून येथें नव्यानें वसवावयाचीं आहेत असा अर्थ संभवत नाहीं. ग्रामोद्धार याचा अर्थ ग्रामसुधारणा. ग्रामसुधारणेचें किंवा संघटनेचें कार्यहि आजच प्रथम सुरू होत आहे असें नाहीं. आपल्याकडे पूर्वापार ग्रामपंचायती होत्या आणि बलुतेदारीसारख्या सांघिक जीवनपद्धतीहि होत्या. कालांतरानें आणि कालमहिम्यानें ही घडी विसकटली. म्हणूनच ग्रामोद्धाराचा प्रश्न उपस्थित झाला. 'गांव माझें आणि मी गांवाचा' अशी निष्ठा पूर्वींच्या ग्रामीण जीवनपद्धतींतून उत्पन्न झाली होती. अलीकडच्या सहकारी कार्यपद्धतीमागेंहि 'प्रत्येक जण सर्वांचा आणि सर्व प्रत्येक जणाचे' अशा प्रकारचीच निष्ठा आहे. त्यामुळें ग्रामसंघटनेची विस्कटलेली घडी फिरून बसविण्यास हें कार्य अतिशय उपयुक्त होणार आहे. उदाहरणार्थ, ह्या सहकारी कार्यपद्धतीचा अंगिकार केल्यास तुकड्यातुकड्यांनीं शेती करणाऱ्या कुळास एकत्र आणतां येईल आणि एकत्र झालेल्या जमिनीच्या उपयोगानें निरनिराळे उपयुक्त धंदे करितां येतील. दुधाचा धंदा करावयाचा असल्यास ह्या जमिनींतील एका पट्टयांत कुरण राखतां येईल. गुरांचे गोठे आणि यंत्रसामुग्रीची तजवीज करितां येईल. याखेरीज चामडी कमाविणें व कातडी वस्तु तयार करणें, तेल गाळणें, वेत, बांबू व काथ्याचे जिन्नस बनविणें, तांदुळासारखीं धान्यें सडणें इ. अनेक उपयुक्त व्यवसाय सहकारी पद्धतीनें सुरू केल्यास खेडीं स्वयंपूर्ण होतील. मात्र ह्या सर्व कार्यामागें बळकट नैतिक अधिष्ठान हवें. गांवच्या गरजा गांवांतच भागल्या पाहिजेत, गांवच्या माणसाला गांवांतच काम मिळालें पाहिजे. आणि सर्व उद्योगाचें श्रेय गांवांतील माणसांच्या हितासाठींच खर्ची पडलें पाहिजे हें सूत्र लक्षांत ठेवून आणि प्रत्येकानें आपली नैतिक जबाबदारी ओळखून सहकारी पद्धतीनें कार्य केल्यास ग्रामोद्धाराचें ध्येय गांठण्यास विलंब लागणार नाहीं."

---

**ॲवार्ड आणि बँका**—बँकेंतील नोकऱ्या, पगारादिकासंबंधीं औद्योगिक कोर्टानें जो निर्णय दिला आहे, त्यामुळें बऱ्याच बँकांवर फार बोजा पडणार आहे, कांहीं बँकांना तर आपला व्यवहार बंदहि करावा लागेल, असा इशारा इंडियन मर्चंट्स् चेंबरनें सरकारकडे केलेल्या निवेदनांत दिला आहे.

**फिलिपाइन्सला मद्रासकडील गुरें**— नेलोरमधील १९४ गुरें एका अमेरिकन बोटीनें नुकतीच फिलिपाइन्स बेटांना रवाना झालीं. त्यांत ३४ बैल आहेत. फिलिपाइन्सला नेण्यांत यावयाच्या गुरांपैकीं हा पहिला हप्ता आहे. एकूण ४०४ गुरें त्या देशाला पुरवावयाचीं आहेत. हीं गुरें त्या देशानें विकत घेतलीं आहेत.

## इन्कम टॅक्स रिटर्न फॉर्ममध्यें महत्त्वाच्या दुरुस्त्या

गॅझेट ऑफ इंडियाच्या ताज्या अंकांत इन्कम टॅक्स रिटर्न फॉर्ममध्यें करण्यांत आलेल्या दुरुस्तीबाबत एक महत्त्वाचें पत्रक प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. या दुरुस्तीनुसार कर भरणारास त्याच्या मतें कर आकारतां येणार नाहीं असें उत्पन्न, नफा अगर कमाई दाखविणारें एक नवीन सदर या फॉर्ममध्यें घालण्यांत आलें आहे.

सध्यां वापरल्या जाणाऱ्या फॉर्ममध्यें जमा अगर खात्यावरील येणें यापैकीं वादग्रस्त बाबी दाखविण्यास जागा नसल्यामुळें आतांपर्यंत यासंबंधीं अनेक अडचणी उपस्थित होत असत. कायदेशीर रीत्या प्राप्तीकर आकारतां येईल अशी एकादी बाब रिटर्नमधून वगळली जाई तेव्हां अशी वगळणूक दंडास पात्र आहे असें प्राप्तीकर अधिकाऱ्यास वाटे. त्याप्रमाणें अशी बाब कायद्याप्रमाणें उत्पन्नांत जमा होत नाहीं अशा प्रामाणिक समजुतीनें कर भरणारानें रिटर्नमधून वगळली असतांही हा समज कायदेशीर दृष्ट्या चुकीचा असल्याचें आढळून आल्यास तो शिक्षेस पात्र होण्याची शक्यता होती.

रिटर्न फॉर्ममध्यें आतां करण्यांत आलेल्या विस्तारामुळें या अडचणी दूर झाल्या आहेत. कर भरणारानें आतां वादग्रस्त बाबी नवीन सदरांत दाखवून दिल्यास एकूण उत्पन्नाच्या आंकड्यांतून ती बाब त्यास सहज वगळतां येईल. नवीन सदरांत अशा बाबी नमूद केल्या असल्या तरी 'त्यावर कर आकारतां येणारच नाहीं' असें आपलें म्हणणें मांडण्यास कर भरणारास प्रतिबंध नाहीं.

या फॉर्ममध्यें करण्यांत आलेल्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या दुरुस्तीनुसार, उत्पन्न आंकड्यांसहीत नफा—तोटा व शिल्लकींच्या तक्त्याबरोबरच उत्पादनाचा अगर व्यापाराचा हिशेब दाखविणारी एक प्रतही सादर केली पाहिजे.

---

## रिझर्व्ह बँकेस विकलेल्या डॉलर्सच्या व्यवहारांतील नफा

मुंबईमधील एका खाजगी लिमिटेड कंपनीचा कपास, परराष्ट्रीय हुंडणावळ, वगैरेचा धंदा होता. मुंबई, न्यूयॉर्क आणि लिव्हरपूर येथें तिचा व्यवहार चालू असे. फेब्रुवारी, १९४२ मध्यें तिनें रिझर्व्ह बँकेला स्वतःचे अमेरिकेंत पडून असलेले १,०८,००० डॉलर्स विकले. त्यावेळीं चालू हुंडणावळीच्या दरानें रिझर्व्ह बँकेनें त्याची किंमत ३,५४,६०० रु. दिली. कंपनीचीं खरेदीची किंमत व विक्रीची किंमत ह्यांतील तफावत १,५०,५८१ रुपये होती. ह्यावर इन्कम टॅक्स आकारण्यांत येऊं नये, कारण रिझर्व्ह बँकेनें डिफेन्स ऑफ इंडिया रूलखाली हे डॉलर्स सक्तीनें घेतले होते, असें कंपनीचें म्हणणें होतें. रिझर्व्ह बँकेची सक्ती गृहीत धरली, तरीसुद्धां हा विक्रीचा व्यवहार मामुली व्यवहारच गणला पाहिजे; त्यांत १,५०,५८१ रु. चा मोठा फायदा कंपनीस झाला. त्याचेवर कंपनीनें कर भरलाच पाहिजे, असा मुंबई हायकोर्टानें निवाडा केला आहे.

---

### आमचा दिवाळी अंक

"अर्था"चा दि. ८ नोव्हेंबर, १९५० चा अंक "दिवाळी अंक" असून त्यांत दरवर्षीप्रमाणें महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नांवर अनेक अनुभवी तज्ज्ञांचे लेख प्रसिद्ध होतील.

दि. १ नोव्हेंबरचा अंक निघणार नाहीं.

## सर्वसामान्य जनतेच्या नीतिमत्तेचा ऱ्हास हेंच काळ्या बाजाराचें कारण !

### काळा बाजार व्यापारी थांबवूं शकतील काय ?

(ले:- श्री. ना. अ. तेंडोलकर, मॅ. डॉयरेक्टर, दि हिंद एजन्सीज लि.)

( उत्तरार्ध )

शेतकरी वर्गाची वर्गवारी करण्याचे स्थलाभावीं सोडून दिलें तरीहि हा वर्ग एक नंबरचा बनेल असल्याचें आढळतें. मग पुढारी त्यांच्या गुणाचे व सचोटीचे कितीहि गुण गावोत. लेव्ही कशी चुकवावी, कर्ज कसें बुडवावें, सरकारी स्वस्त दराचें धान्य कसं मिळवावें, व आपलें चोरबाजारांत कसें विकावें, हा या वर्गाचा मोठा धंदाच आहे. या वर्गास थोडेसें पोटास मिळतांच किंवा हातांत थोडा फार पैसा खेळूं लागतांच हा वर्ग बाजीरावाप्रमाणें चैन करूं लागला आहे. पावशेर दुधांत शेरभर पाणी मिसळून तें रुपयास शेर कसें विकावें, व पुनः उद्दामपणें "पाहिजे तर घ्या" कसें म्हणावें हें या वर्गास चांगलें माहीत झालें आहे. लोण्यांत पीठ किंवा दहीं मिसळले तर तुपांत डाल्डा ( वनस्पती तूप ) घातलेलें. भाजी महाग कशी करावी, रुपयास शेर तांदूळ व दीड शेर जोंधळा बरोबर फिरून विकणें हा तर कांहींचा धंदाच आहे. आपला गूळ बाजारांत दीड रुपयानें शेर विकला जावा व त्यावर नियंत्रण नको म्हणून हा वर्ग कांगावा करील व तेरा आणे शेराची साखर जास्त मिळावी म्हणून चळवळ करेल. कारण आज सरकार व पुढारी त्यांच्या बाजूचें आहे. या वर्गाच्या रहाणीचें मान युद्धपूर्व काळापेक्षां आज चार ते पांच-पटीनें वाढलें आहे. कामाचा कंटाळा व चैनीचा जिव्हाळा अशा वृत्तीमुळेंच या वर्गानें अनेक बाबींचें दुर्भिक्ष निर्माण करून किंमती वाढवून ठेविल्या आहेत.

यानंतर दहा टक्के मजुरांसंबंधीं विचार करतां " कमींत कमी काम, जास्तींत जास्त दाम, सुट्या, आर्थिक सवलती, बेशिस्त व बेजबाबदार वागणूक क्षम्य, सर्व मोफत व मिळविलेल्या उत्पन्नांत हिस्सा, हा याचा शिरस्ता आहे. मजुरांतील वाढती बेजबाबदार वृत्ति व वाढता कामचुकारतट्टूपणा यामुळें सारखें उत्पादन घटत आहे. सर विश्वेश्वर अय्या यांचे शब्दांत, एक मजूर कामास नेमावयाचा म्हणजे तो काम करतो कीं, नाहीं हें पहावयास एक मुकादम नेमावा लागतो व त्या मुकादमावर देखरेख ठेवण्यासाठीं एक दिवाणजी ठेवावा लागतो, व उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणांत वाढत जात आहेत. आजपर्यंत कोणत्याहि मजूर संघटनेनें त्यांना कार्यक्षमता कशी वाढवावी, उत्पादन कसें वाढवावें, आपलें कर्तव्य प्रामाणिकपणें कसें पार पाडावें या संबंधीं एक चकारशब्दहि काढलेला नाहीं. असें असतांही सरकारें त्यांच्या रोषास भिऊन त्यांची पाठीराखी बनल्याची आढळतात. कोर्टे निर्णयाविरुद्ध यांनीं वर्तन केल्यास कोर्टास त्यांत अपमान वाटत नाहीं. आजच्या उत्पादन खर्चांतील मजुरीचे दर ६ ते ७ पटीनें वाढले आहेत तर या उलट कारखानदारीवरील निरनिराळ्या प्रकारचे कर नऊ पटीनें वाढले आहेत. व्यापारी कारखानदारास कांहीं हिस्सा रहातो किंवा कसें हा प्रश्न सोडला तरी आज सेल्स टॅक्स, ऑक्ट्रॉय, इनकमटॅक्स वगैरेंच्या रुपानें प्रत्येक शंभर रुपये व्यापारामागें सरकारला मात्र कमींत कमी नऊ रुपये द्यावेच लागतात. अर्थात हा बोजा जनतेइतकाच व्यापाऱ्यांवरहि पडतो. कारण त्यास न झालेल्या प्राप्तीवरहि कर भरावा लागतो.

महागाईपेक्षां मजुरीचे दर अधिक वाढल्यानें, मजूरवर्ग चैनी, आळशी व मिरासदार बनला आहे. वाढलेलें उत्पन्न चैनीखातर काळ्या बाजारांत खर्च करीत आहे. यांतच अज्ञ, बेजबाबदार पण झटपट पुढारीपणाची हौस असणारा बराच तरुणवर्ग सामील झाल्यानें, पगारवाढीपाई कारखाना बंद झाला, उत्पादन घटलें, भागीदारांना नफा न मिळाला तरीहि हे पुढारी पगारवाढीची व बोनसची मागणी चालू ठेवीत आहेत. पगारावरच सर्व मिळकत खर्च पडूं लागल्यानें कारखान्यांची दुरुस्ती व वाढ खुंटली आहे. जुन्या ऐवजी अद्ययावत यंत्रसामुग्री बसविणें या कारखान्यांना अशक्यप्राय झालें आहे. नवीन कारखाने निघणें बंद झालें असुन निघालेले कारखाने अपुऱ्या भांडवला अभावीं बंद पडत आहेत. सर्वत्र उद्योगधंद्यांना भांडवलाचा कमालीचा तुटवडा भासत आहे. कारखानदारींत भांडवल गुंतविणारा कारखानदार व व्यापारी हा वर्ग इनकमटॅक्सच्या जाळ्यांत भरडून निघत असून, मध्यम वर्गास जगणेंहि कठीण झाल्यानें तो आज भांडवल गुंतवूं शकत नाहीं. शेतकरी हातांत पैसा येतांच चैनी, घरें व जमिनी यांत भांडवल गुंतवीत असल्यानें या सर्वांच्या किंमती भरमसाट वाढल्या आहेत. मजूर हा जात्याच उधळखोर असल्यानें त्याची वाढलेली प्राप्ति कारखानदारीच्या वाढीस हातभार लावूं शकत नाहीं. वाढती मागणी व वाढती घट असा आजचा लढा आहे.

यावर उपाय म्हणून राष्ट्रीयीकरण सुचविण्यांत येतें. यामागील मुख्य हेतु जनतेची सोय हा नसून संघटित संघ व संघटित राजकीय पक्ष निर्माण करणेचें एक साधन हा एकच हेतु प्राबल्यानें दिसून येतो. स्टेट ट्रान्सपोर्टेनें लोकांवरील कराचा बोजा वाढला असून सरकारचें इनकमटॅक्स वगैरेंचें उत्पन्न बुडालें आहे. जनतेसही अनेक गैरसोयी सोसाव्या लागल्या आहेत. फायदा ड्रायव्हर—क्लिनर व राजकीय पक्षांचा झाला आहे. रेशनिंग डिपार्टमेंटचें दुसरें उदाहरण घेतल्यास जनतेस कुजकें धान्य, मिश्रधान्य, न खाण्यासारखें धान्य व न आवडेल असें कापड खरीदण्याची पाळी. इतकें असूनहि सरकारला हें खातें चालविण्यासाठीं दरवर्षी कोट्यावधी रुपये टॅक्सपेयरकडून वसूल करून द्यावे लागतात. सहकारी सोसायट्यांच्या सावळ्या गोंधळाबद्दल व डोईजड खर्चाबद्दल लिहावें तेवढें थोडेंच. म्हणजे राष्ट्रीयीकरण, सहकार वगैरेंमुळें किंमती कमी होऊं शकत नाहीं. काळ्या बाजारास आळा बसत नाहीं, तर त्याचें स्वरूप बदलतें येवढेंच !

आतां राहिल्या वर्गासंबंधीं विचार करतां व्यापारी कारखानदाराच्या तीन टक्के वर्गानें १९४२ ते १९४६ या अवधींत तुटवडा व मागणी यामुळें किंमती वाढत गेल्यानें पैसा मिळविला. परंतु १९४६ पासून जी उतरती कळा लागली ती अद्यापहि थांबूं शकत नाहीं. भरमसाट प्राप्तीवरील कर भरावे लागले, बँकांनीं हात आंखडतां घेतला, वगैरे अनेक कारणांमुळें त्यांना आपली परिस्थिति सांवरणें कठीण झालें आहे. एकीकडे सरकारी कर व दुसरीकडे सार्वजनिक देणग्या या दुहेरी कचाट्यांतून व्यापाऱ्यांना मार्ग काढतां नाकेनऊ येत असूनही, आज व्यापारी व कारखानदार वर्ग राष्ट्रहितासाठीं जेवढी झीज सोसत आहे, उदार अंतःकरणानें व सढळ हातानें देणग्या देत आहे त्याच्या एक दशांश हिस्सासुद्धां व्यापाऱ्यापेक्षां १०० शंभर टक्के गबर झालेला शेतकरी वर्ग देत नसून राष्ट्रकार्यास किंवा उद्योगधंद्याचे

वाढीस यांचा उपयोग होत नाहीं. तंबाकूस भाव येतो असें दिसतांच सरकारी हुकूम धाब्यावर बसवून अधिक एकर जमिनींत तंबाकू कसा पिकवावा, सरकारी परमिटवर शेती आयुधें मिळवून तीं काळ्याबाजारांत कशीं विकावींत व पुन्हां मी अडाणी शेतकरी म्हणून सहानुभूति कशी मिळवावी हें या वर्गापासून शिकण्यासारखें आहे. या काळ्या बाजाराचा खरा तडाखा कोणास बसला असेल व यांत खरा बळी पडला असेल तर तो शाळामास्तर.

म्हणजे आमचा काळा बाजार हा सामुदायिक आहे. त्यांत सर्वच, शेतकरी–कामकरी –कारखानदार–व्यापारी, आपआपल्या ताकतीप्रमाणें भाग घेत असून कुवतीप्रमाणें हिस्सा उचलत आहे. यांस बळी पडणारा एकटा वर्ग म्हणजे मध्यमवर्ग व या विरुद्ध ओरड करणारा वर्ग म्हणजे रिकामटेकड्या पुढाऱ्यांचा व वृत्तपत्रांचा. काळ्या बाजाराविरुद्ध इतरांचीहि हांकाटी आहे, व तो थांबवा असे सर्वच म्हणत आहेत पण प्रत्येकास मात्र तो दुसऱ्यानें करूं नये व दुसऱ्यानें थांबवावा, अशी असणारी तीव्र इच्छा व स्वतः मात्र काळा बाजार करण्याचा हव्यास! अशा स्थितींत एकटा व्यापारी यास तोंड देऊं शकत नाहीं अथवा यांतून मार्ग काढू शकत नाहीं. काळ्या बाजाराबद्दल व्यापाऱ्यास फांशी द्या म्हणणे सोपें, पण सर्वच जनतेस फांशी द्या म्हणावयाचें म्हणजे यांना फांशी तरी द्यावयाचें कुणी हाही प्रश्नच आहे. तर काळा-बाजार हा प्रत्येकानें स्वतःपासून थांबविला तरच तो बंद होऊं शकेल. पण हें शक्य आहे काय? (समाप्त)

---

**ओरिएंट पेपर मिल्स लि.**—ह्या कागदाच्या कंपनीनें ३१ मार्च, १९५० अखेरच्या सहा महिन्यांत ११,५८,९२३ रुपये नफा झाल्याचें जाहीर केलें आहे. ३ लाख रुपये घसाराफंड आणि ७ लाख रुपये करांसाठीं बाजूला काढून ठेवून दर भागामागें १२ आणे नफा जाहीर करण्यांत आला आहे. कंपनीच्या मालकीच्या जमिनी, इमारती आणि यंत्रसामुग्री इत्यादींची हिशेबांतील किंमत सध्याच्या बाजारभावानें १ कोटी रुपयांनीं अधिक होते, त्याप्रमाणें हिशेब सुधारण्यांत आले आहेत.

**मद्रास सरकारला रिझर्व्ह बँकेची मदत**—मद्रास सरकारच्या भांडवली स्वरूपाच्या विकास योजनांसंबंधीं रिझर्व्ह बँक काय मदत करूं शकेल ह्या विषयीं रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि मद्रासचे अर्थमंत्री यांच्यांत नुकतीच चर्चा झाली. मद्रास सरकारच्या अशा योजनांना रिझर्व्ह बँक शक्य ती मदत करील, असें आश्वासन देण्यांत आल्याचें कळतें.

**इंदूरजवळ पॉवर अल्कोहोलचा कारखाना**— इंदूरपासून १२० मैलांवर जाओरा गांवीं अल्कोहोल तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत येणार आहे. जवळपासच्या ३ साखरेच्या कारखान्यांतील मळीपासून दरवर्षी सुमारें ५ गॅलन्स पॉवर अल्कोहल ह्या कारखान्यांत तयार होईल. सरकार १ लाख रु. भांडवल घालणार असून ४ लाख रु. दोन साखर कारखाने घालणार आहेत.

**भारतीय उद्योगधंद्यांसाठी जर्मन तज्ज्ञ**—भारतीय कारखान्यांना जर्मन तज्ज्ञांशीं करार करून त्यांना बोलाविण्यास परवानगी देण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे. परंतु असें करण्यापूर्वी अशा जर्मन तज्ज्ञांचे पगार रिझर्व्ह बँक परदेशी पाठवून देईल कीं नाहीं हे कारखानदारांनीं बँकेकडून आधी निश्चित करून घ्यावयाचें आहे. भारतांत येण्याची परवानगी केवळ मिळाल्यामुळें त्यांना आपले पगार आपल्या देशीं पाठवितां येतील असें नाहीं. आतांपर्यंत भारतांत आलेले जर्मन तज्ज्ञ भारतीय सरकारनेंच करार करून आणले होते.

**ऑस्ट्रेलिआचें कोळशाचें उत्पादन**—कोळसा आणि इतर मूलभूत धंद्यांचें उत्पादन पुरेसें होत नसल्यानें ऑस्ट्रेलिआच्या भरभराटीला धोका उत्पन्न झाला आहे. ऑस्ट्रेलिआंतून निर्यात होणाऱ्या कोळशाची किंमत १९३९ सालापेक्षां ५ पटीनें वाढली आहे आणि ऑस्ट्रेलिआंत आयात होणाऱ्या कोळशांत तिपटीनें वाढ झाली आहे. कोळशाच्या किंमतींत वाढ होण्याच्या कारणांत मजुरांच्या वेतनाचें स्थैर्य, ४० तासांचा आठवडा, सामाजिक सुखसोयींची वाढ, इत्यादि कारणें ऑस्ट्रेलिआच्या मुख्य प्रधानांनीं सांगितलीं आहेत.





—सर्व प्रांतांतील— सुती–गरम–रेशमी —खादीचें माहेरघर— || खादी मन्दिर || १६१, बुधवार पेठ दमडेरे बोळाजवळ, पुणें २.

## महाराष्ट्रावर लक्ष्मीची कृपा केव्हां होईल ?

( लेखक—श्री. ग. कृ. चितळे, बी. कॉम., मुंबई-पुणें )

२००६ संवत् संपून २००७ संवत् शुक्रवार ता. १० नोव्हेंबरला सुरू होईल. हिंदुस्थान स्वतंत्र झाला, स्वतःचा मालक झाला. स्वतःचें घर स्वतः चालविण्याची जबाबदारी माथ्यावर घेऊन यापुढें आपण स्वतःची उन्नति करून घ्यावयाची आहे. स्वातंत्र्याचीं दोन वर्षे निघून गेलीं. मजा झाली, सोहळे झाले. आतां थोडें स्थिरस्थावर झालें व यापुढें "विचार" करून "आचार" केला पाहिजे. एक नाचला म्हणून आपण नाचून भागणार नाहीं. तेव्हां अंतर्मुख होऊन, आपल्यापाशीं काय आहे, हें पाहून, तें वाढवावयाचें कसें हें पाहिलें पाहिजे.

महाराष्ट्र नांव केवढें मोठें, परंतु "लक्ष्मी"ची कृपा कमी. ती उणीव धैर्य, सचोटी, महत्त्वाकांक्षा, कल्पकता यांनीं थोडीफार भरून निघते. सामुदायिक व्यापार, एकमेकांवर विश्वास, दुसऱ्यास वेळींच हात देऊन संभाळून घेणें, वगैरे गुण हळू हळू आमच्यांत येत आहेत असें भासतें. व्यापार-कारखाने यांच्या मदवणी सामुदायिकपणें दूर करणें आतां महाराष्ट्राच्या थोडें ओंगवळणी पडूं लागलें आहे, ही समाधानाची गोष्ट आहे. यापुढें महाराष्ट्राची कीर्ति व संपत्ति वाढविणें महाराष्ट्रीय व्यापारी व कारखानदार हे स्वतः आणि त्यांच्या संघटना व महाराष्ट्राची तरुण पिढी यावर येऊन पडलें आहे.

कोणचेंही कार्य, व्यवहार, सौदा करतांना त्यामुळें महाराष्ट्राची कीर्ति, संपत्ति व पत ही वाढेलना हा विचार आमच्यामध्यें रोमरोमांत भाला पाहिजे. "व्यक्ति" ही गोष्ट जरा दूर सारली पाहिजे व समाज, महाराष्ट्रीय समाज व त्याची भरभराट हें सारखें आमचे डोळ्यापुढें उभें राहिलें पाहिजे.

हें होण्यासाठी आम्हांत "सचोटी" ही आली पाहिजे. व्यापार-धंदा म्हणजे गिऱ्हाइकास हातोहात फसविणें, व तेंही जास्तींत जास्त, ही भावना नष्ट होऊन, गिऱ्हाइकाचें समाधान ही व्याख्या रूढ झाली पाहिजे. व्यापारांत यश "स्वस्त खरेदी" व "वाजवी मोबदला घेऊन जलद विक्री" यामधें आहे. योग्य अभ्यास, चौकशी, वाचन करून "स्वस्त खरेदी" करता येते व त्याचप्रमाणें गिऱ्हाइकाचे आवडी निवडीचें निरीक्षण करून, "वाजवी मोबदला" घेऊन विक्री करता येते.

स्वतंत्र विचार ही एक महत्त्वाची बाब आहे. एकानें एक धंदा करून चार पैसे मिळविलेले पाहिले, कीं त्याचे समोर तोच धंदा सुरू करून त्यास "पाडणें" ही गोष्ट वर्ज्य व्हावयास पाहिजे. त्यांत महाराष्ट्राची हानी आहे, भांडवलाचा नाश आहे. खुमखुमी असेल तर दुसऱ्या गांवीं, दुसऱ्या पेठेंत, तो धंदा करावा. त्याचप्रमाणें, प्रत्येक बाबींत स्वतःचें एकादें वैशिष्ट्य असावें. "पत" वाढेल, "शब्दाला" मान राहील, गिऱ्हाईकाचें "मन" दुखावलें जाणार नाहीं, "भेसळ" नाहीं, या गोष्टींकडे महाराष्ट्रानें फार लक्ष दिलें पाहिजे.

"आढा पाहून खर्च" ही सध्यां अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. "विमानानें प्रवास" व तो खर्च घाल कंपनीवर व तोही "खरेदी खात्यांत" हें धोरण "दिखाऊ" पण "टिकाऊ" नाहीं. पैसा, पैसा जोडला पाहिजे व नफ्यापेक्षां खर्च जास्त होता कामा नये, अशा कांहीं महत्त्वाच्या तत्त्वांचे कडे "महाराष्ट्रानें" लक्ष देऊन "महाराष्ट्राची" पत, संपत्ति, व्यापार, कारखानदारी उच्च प्रतीची केली पाहिजे व जगाची पेठ आज नाहीं पण हिंदुस्तानाची पेठ आज काबीज केली पाहिजे. मगच महाराष्ट्रावर "लक्ष्मी"ची कृपा झालेली दिसून येईल व तरुणपिढी की जीवर पुढील "महाराष्ट्र" भरवसा ठेवीत आहे, तीच महाराष्ट्राला "उन्नति"कडे नेईल.

---

### विमा वार्षिक

"विमा आणि व्यापार" मासिकाचे संपादक श्री. पी. एस. काणे ह्यांनीं हें वार्षिक नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. मासिकाचा एप्रिल—मे १९५० चा जोड अंकच प्रस्तुत वार्षिकाच्या स्वरूपांत काढण्यांत आला आहे. विमा एजंटांचे उपयोगासाठींच ह्या वार्षिकाची योजना असल्याकारणानें, त्यांना मार्गदर्शक अशा कांहीं सूचना प्रो. एन. जी. नारळकर ह्यांनीं केल्या आहेत, त्या त्यांच्या प्रस्तावनेंत दिलेल्या आहेत. विमा वार्षिकास आवश्यक ते तक्ते व माहिती प्रस्तुत संकलनांत देण्यांत आली आहे. वार्षिकाच्या संपादकीय मजकुराच्या १५ ओळीं मराठीमध्यें आहेत.


---

### मोटारचा विमा*

मोटार वाहनांचे कायद्याप्रमाणें मोटारीचे बाबतींत थर्ड पार्टी इन्शुअरन्स आतां सक्तीचा झाला आहे. ह्या कायद्यानें मोटार मालकावर टाकलेली जबाबदारी व त्या विम्याची तपशीलवार माहिती ह्याचें ज्ञान प्रत्येक मोटार मालकास आवश्यक झालें आहे. प्रस्तुत पुस्तकाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागांत मोटार विम्या-विषयीं सर्वसाधारण माहिती देण्यांत आली असून दुसऱ्या भागांत (१) खासगी मोटार गाड्या, (२) मोटार सायकली, (३) व्यापार विषयक वाहतुक करणाऱ्या मोटार गाड्या व (४) संकीर्ण वहानें ह्यांच्या विम्यांचे दर दिले आहेत. तिसऱ्या भागांत मोटारच्या विम्याबाबत कांहीं मनोरंजक व उद्बोधक निवाडे देण्यांत आले आहेत. पुस्तकाचे शेवटीं मोटारचे विमे स्वीकारणाऱ्या भारतीय कंपन्याची यादी जोडली आहे.

* लेखकः—कृष्णाजी रामचंद्र वैद्य, ब्रँच सेक्रेटरी, युनिव्हर्सल फायर अँण्ड ज. इं. कं., पुणें शाखा. विमा आणि व्यापार प्रकाशन. पृ. सं. १४ किं. १॥ रु.


रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्हीं बदली करून देतों.

पेडणेकर आणि कं. लिमिटेड

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.
तारेचा पत्ताः—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८




किर्लोस्कर बंधु लिमिटेड. किर्लोस्करवाडी

## परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल शिलकेची स्थिति कायम

### १९५० च्या पहिल्या सात महिन्यांतील आंकडेवारी

जुलै १९५० ला संपलेल्या पहिल्या सात महिन्यांत दुर्लभ व सुलभ या दोन्ही चलन विभागांचे बाबतींत भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांत अनुकूल शिलकेची स्थिति टिकून राहिली आहे. या कालावधींत व्यापारांतील एकूण शिलकेंत ३·४२ कोटी रु. ची वाढ दिसून आली. १९४९ च्या याच कालावधींतील सदरहू शिलकेंत १७०.४४ कोटी रु. तूट होती.

दुर्लभ चलनाच्या देशांतून ८१·६७ कोटी रु. किंमतीची आयात करण्यांत आली, तर या देशांकडे ८४ कोटी रु. किंमतीची निर्यात होऊन २·३३ कोटी रु. अनुकूल शिल्लक राहिली. १९४९ च्या पहिल्या सात महिन्यांतील ५१·२९ कोटी रु. प्रतिकूल शिलकेशीं तुलना करतां या वर्षीच्या पहिल्या सात महिन्यांतील व्यापाराची स्थिती अधिक चांगली आहे. १९४९ च्या पहिल्या सात महिन्यांत भारतानें ५९·९९ कोटी रु. किंमतीची निर्यात आणि १११·२८ कोटी रु. किंमतीची आयात केली होती.

सुलभ चलनाच्या देशांतून १८७·९२ कोटी रु. किंमतीची आयात झाली असून त्या देशांकडे १८९·९५ कोटी रु. ची निर्यात झाली आणि त्यामुळें २·०३ कोटी रु. ची अनुकूल शिल्लक दिसून आली. गेल्या वर्षाच्या याच कालावधींत भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांतील प्रतिकूल शिल्लक १११·०१ कोटी रु. होती, कारण तेव्हां २८०·११ कोटी रु. आयात आणि फक्त १६९·१ कोटी रु. निर्यात झाली होती.

जुलै १९५० मध्यें अमेरिकेबरोबरच्या भारताच्या व्यापारांत १·५६ कोटी रु. प्रतिकूल शिल्लक होती. जुलै १९४९ मध्यें सदरहू देशाबरोबरच्या भारताच्या व्यापारांत ४·४३ कोटी रु. प्रतिकूल शिल्लक होती ही गोष्ट लक्षांत घेतां या वर्षी प्रस्तुत बाबतींत सुधारणा झाली आहे असें दिसून येईल. या वर्षीच्या जुलैमध्यें ग्रेट ब्रिटनबरोबरच्या व्यापारांत २.५१ कोटी रु. ची प्रतिकूल शिल्लक होती, परंतु गेल्या वर्षांतील जुलैमध्यें तं ७·६३ कोटी रु. होती हें पहातां यंदा सुधारणा झालेली दिसून येते.

पाकिस्तानबरोबरच्या जुलै महिन्यांतील व्यापारांत ७८ लक्ष रु. रु. अनुकूल शिल्लक दिसून आली. या वर्षाच्या पहिल्या सात महिन्यांतील एकूण व्यापारांतहि ४.३२ कोटी रु. अनुकूल शिल्लक राहिली आहे. गेल्या वर्षी याच कालावधींत २·७७ कोटी रु. प्रतिकूल शिल्लक होती.

### को. कंझूमर्स सोसायट्यांची परिषद

मुंबई राज्यांतील को. कंझूमर्स सोसायट्यांची परिषद श्री. टी. ए. रामलिंगम चेट्टियार, एम्. पी., मद्रास यांचे अध्यक्षतेखालीं मुंबई, येथें १५ व १६ ऑक्टोबर ह्या दिवशीं भरणार होती. ती त्या ऐवजीं २९ व ३० ऑक्टोबर ह्या दिवशीं भरेल.

### श्री. दा. वा. पोतदार

मुंबई प्रांतिक सहकारी इन्स्टिट्यूटवर मध्यभागातर्फे श्री. दा. वा. पोतदार ह्यांची निवड झाली आहे. त्याचप्रमाणें, पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघाचे ते एकमतानें अध्यक्ष निवडून आले आहेत

### दि कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक, लि. पुणें

सन १९५०-५१ सालाकरितां दि. १०-९-१९५० ला झालेल्या वार्षिक निवडणुकींत निवडून आलेली अधिकारी मंडळें.

**सल्लागार मंडळ**

१. श्री. पांडव नारायण विनायक, बी. ए. ( अध्यक्ष )
२. श्री. कानगो श्रीनिवास अमृत (उपाध्यक्ष )
३. श्री. जेजुरीकर गणेश नरहर.
४. श्री. करमरकर मोरेश्वर गोविंद, एम. ए., बी. टी.
५. श्री. मोघे दामोदर मोरेश्वर.

**कार्यकारी मंडळ**

१. श्री. वैद्य जयवंत दत्तात्रय, बी. ए., ( कार्याध्यक्ष )
२. श्री. कुंभारे बाळकृष्ण विष्णू, बी. ए. ( उप कार्याध्यक्ष )
३. श्री. ओगले शंकर लक्ष्मण, एम्. ए, एलएल्. बी., बी. टी.
४. श्री. भट चिन्तामण वासुदेव, बी. ए., एलएल्. बी.
५. श्री. दात्ये विनायक नारायण, बी. ए.
६. श्री. कुलकर्णी सदाशिव वामन, बी. ए., एलएल. बी.
७. श्री. देव पांडुरंग रामचंद्र.
८. श्री. हर्डीकर विश्वास लक्ष्मण, जी. डी. सी.
९. श्री. पारसी दत्तात्रय लक्ष्मण, वकील.
१०. श्री. देहाडराय यशवंत बाळकृष्ण, बी. ए., बी. टी.
११. श्री. लेले वामन महादेव.

**आयव्यय निरीक्षक**

१. श्री. जोशी महादेव रामचंद्र, एल्. सी. सी.
२. श्री. सुभेदार पुरुषोत्तम वासुदेव.

### जत सहकारी शिक्षण वर्गाचा समारोप समारंभ

दक्षिण सातारा जिल्हा को. बोर्डाच्या विद्यमानें सुरू असलेल्या सहकारी सेक्रेटरी वर्गाचा "समारोप समारंभ" जत येथें श्री. रामराव विद्यामंदिराच्या हॉलमध्यें ता. १८-१०-'५० रोजीं सायंकाळीं ५ वा. लेफ्टनंट कमांडर हिज हायनेस श्री. विजयसिंहराव रामराव डफळे, राजेसाहेब जत, यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

### विद्या प्रसारिणी सभेच्या भारत हायस्कूलची नवी इमारत

विद्या प्रसारिणी सभेनें आपल्या भारत हायस्कूलसाठी पुणें येथें सुमारें ३ लक्ष रु. खर्चून एक नवी उत्कृष्ट इमारत बांधली आहे. तिचा उद्घाटन समारंभ ना. बा. गं. खेर, मुख्य व शिक्षण मंत्री, ह्यांच्या हस्तें शनिवार दि. २१ रोजीं पार पडला. पुणें व लोणावळें येथील तिच्या इंग्रजी-मराठी शाळांतून सुमारें २,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ह्या नव्या इमारतीमुळें सभेच्या लौकिकांत व लोकप्रियतेंत उत्कृष्ट भर पडणार आहे.

### प्रकाशाची गति किती?

आतांपर्यंत अमेरिकन संशोधक मि. मायकेलसन ह्यांनीं केलेल्या प्रयोगावरून प्रकाशाची गति दर सेकंदास १,८६,२७१ मैल आहे असें मानण्यांत येत असे. परंतु ब्रिटिश सरकारच्या शास्त्रीय संशोधन खात्यांतील प्रयोगांतीं ही गति १,८६,२८२ मैल आहे असें ठरविण्यांत आलें आहे. ह्या नव्या सुधारलेल्या संशोधनामुळें राडर, अणु विज्ञान आणि ज्योतिर्विज्ञान ह्या विषयांचीं गणितें अधिक बरोबर काढतां येऊं लागतील.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.